# उद्योगांच्या पीछेहाटीला मुख्यमंत्रीच जबाबदार

## 'एसएमई'चे अध्यक्ष साळुंकेंचा आरोप

विशेष प्रतिनिधी, नगर

उद्योगांच्या बाबतीत महाराष्ट्राची पीछेहाटच सुरू आहे. या घसरणीला मुख्यत्वे राज्य सरकार व मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण हेच जबाबदार आहेत असा आरोप स्मॉल अँड मिडीयम बिझनेस चेंबरचे (एसएमई) अध्यक्ष चंद्रकांत साळुंके यांनी करून ही पिछेहाट मान्य नसेल तर मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्रातील उद्योगांशी संबंधित आकडेवारी जाहीर करावी असे आव्हान दिले.

उद्योगात महाराष्ट्र मागे का पडला, याचा राज्य सरकारने अजूनही विचार केलेला नाही, असे सांगून साळुंके म्हणाले,'सध्याच्या राज्यकर्त्यांना बहुदा उद्योगवाढीचे महत्वच समजलेले नाही. लघु व मध्यम उद्योगांची राज्यात अत्यंत दयनीय अवस्था आहे. मूलभूत सोयी-सुविधा, वित्तपुरवठा, निर्यातीसाठी पोषक वातावरण अशा सर्वच आघाड्यांवर सावळागोंधळ असून, त्यामुळे राज्यातील असंख्य छोटे व मध्यम उद्योग बंद पडले आहेत. त्याचेही राज्य सरकारला सोयरसुतक नाही. तुलनेने अन्य राज्ये आता खूपच पुढे चालली आहेत. विशेषतः गुजरात, कर्नाटक व आंध्र प्रदेश ही शेजारी राज्ये प्रगतिपथावर आहेत. एफडीआय धोरणानुसार राज्यात काय स्थिती आहे, याचाही तपशील राज्य सरकारकडे उपलब्ध नाही. त्याची तपासणी करण्याचेही कष्ट राज्य सरकारने घेतलेले नाहीत.'

या सगळ्या गोष्टीला मुख्यमंत्री चव्हाण हेच जबाबदार आहेत, असा आरोप साळुंके यांनी केला. ते म्हणाले, शरद पवार, मनोहर जोशी, विलासराव देशमुख या माजी मुख्यमंत्र्यांच्या काळात ही स्थिती नव्हती. तुलनेने त्यांच्या काळात राज्यात उद्योगांना अत्यंत पोषक वातावरण होते. सध्याच्या मुख्यमंत्र्यांना उद्योगांकडे लक्ष द्यायला वेळ नाही, असा आरोपही साळुंके यांनी केला. त्यांच्या काळात उद्योगांच्या विकासाची कामे थांबली. सध्या तर राज्याला उद्योगमंत्रीच नाही. मावळते उद्योगमंत्री नारायण राणे यांच्याकडे क्षमता आहे, मात्र त्यांनीही उद्योगांच्या प्रश्नांकडे दुर्लक्षच केले असे साळुंके यांनी सांगितले.

### ... तर राज्यातही परिवर्तन!

कोणत्याही राजकीय विचारधारेशी किंवा पक्षाशी आमचा संबंध नाही, मात्र अशीच स्थिती राहिली तर विधानसभेच्या येत्या निवडणुकीत राज्यातील औद्योगिक संस्था व उद्योग क्षेत्र निर्णायक भूमिका घेतल्याशिवाय राहणार नाही. तसे झाले तर, केंद्राप्रमाणे राज्यातही सत्तांतर होईल असा दावा साळुंके यांनी केला. केंद्रात सत्तांतर होण्यात उद्योग क्षेत्राचा मोठा वाटा आहे, असे ते म्हणाले.

लोकसत्ता दि० २६ जुलै २०१४